
Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

# AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com




Scanned with OKEN Scanner

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | मराठवाडी बोली : स्वरुप आणि वैशिष्ट्ये<br>**प्रा. डॉ. आर. एस. बडुरे** | ७५-७८ |
| १५ | आदिवासी साहित्यातील बोलीभाषा<br>**डॉ. विठ्ठल केदारी** | ७९-८१ |
| १६ | म्हणीचा प्राण : बोलीभाषा<br>**प्रा. डॉ. माने हनुमंत तुकाराम** | ८२-८६ |
| १७ | बोलीभाषा, संत परंपरा आणि मराठी साहित्य<br>**श्रीमती. प्रिया शैलेश कदम** | ८७-९१ |
| १८ | बोलीभाषेचे वाहक प्रभावी माध्यम: भारूड<br>**प्रा. डी. के. आंधळे**<br>**डॉ. टी. ए. गित्ते** | ९२-९६ |
| १९ | जागतिक वास्तव आणि बहुभाषिक संस्कृती<br>**प्रा. ज्ञानेश्वर किसन म्हात्रे** | ९७-१०० |
| २० | मराठी साहित्यात वऱ्हाडी बोलीचे अविष्करण<br>**प्रा. डॉ. विजय राऊत** | १०१-१०९ |
| २१ | बोलीभाषेचे साहित्याला योगदान<br>**प्रा. डॉ. आसिया चिश्ती** | ११०-११५ |
| २२ | भास्कर चंदनशिव यांचे कथालेखन : अस्सल मराठवाडी ग्रामीण बोली भाषेची प्रभावी अविष्कार<br>**प्रा. डॉ. दादाराव गुंडरे** | ११६-१२० |
| २३ | मराठी भाषा आणि देहबोलीचे स्वरूप<br>**प्रा. डॉ. चौधरी एन. डी.** | १२१-१२५ |
| २४ | बोलीभाषेने वाढविलेल्या कलाकृतीच्या कक्षा (संदर्भ : नवनाथ गोरे लिखित फेसाटी कादंबरी)<br>**प्रा. बालासाहेब विष्णू कटारे** | १२६-१३० |
| २५ | शेतकरी दीर्घकाव्यातील बोलीभाषा<br>**डॉ. बालाजी व्ही. डिगोळे** | १३१-१३६ |
| २६ | आदिवासी : सांस्कृतिक सामाजिक जीवन<br>**प्रा. डॉ. आहिरे भास्कर मुरलीधर** | १३७-१३९ |




Scanned with OKEN Scanner

# २२. भास्कर चंदनशिव यांचे कथालेखन : अस्सल मराठवाडी ग्रामीण बोली भाषेची प्रभावी अविष्कार

प्रा. डॉ. दादाराव गुंडरे
मराठी विभाग प्रमुख, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब, जि. उस्मानाबाद.

स्वातंत्र्यानंतर पंधरा–वीस वर्षाच्या काळात मराठी साहित्यात एका वैचारिक, सामाजिक चळवळीच्या प्रभावातून जे काही नवीन साहित्य प्रवाह उदयास आले. त्यामध्ये ग्रमीण साहित्य प्रवाहाचा समावेश होतो. ज्या चळवळीने ग्रामीण, तरूण,सृजनशील. संवदेनशील मनास अंतमुर्ख केले, आत्मभान दिले आणि लिहिते केले. कृषीप्रधान देशातील बहुसंख्य अशा ग्रामीण जनतेच्या शोषणाविरूध्द महात्मा फुलेंचा, डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा वारसा चाालवण्याची, त्याकडे लक्ष वेधण्याची भूमिका बजावण्यासाठी, ग्रामीण अस्वस्थता लेखनातून मांडण्यासाठी प्रत्यक्ष ग्रामजीवनातून पुढे आलेल्या अनेक लेखकात ज्येष्ठ ग्रामीण कथालेखक भास्कर चंदनशिव यांचा समावेश होतो. ज्यांनी विशिष्ठ दर्शनबिंदूतून कथा निर्मिती केली. 1970 च्या आसपास मराठवाड्यात जी लेखकांची पिढी लिहिती झाली तिचे महत्वाचे प्रतिनिधी ते आहेत. एक आघाडीचे, ग्रामीण समर्थ कथालेखक म्हणून गौरविल्या जाणाऱ्या चंदनशिव यांनी 'जांभळढव्ह मरणकळा अंगारमाती, नवी वारूळे, बिरडं' या कथासंग्रहाची निर्मीती केली. विशिष्ट स्थलकालबध्द असे ग्रमीण जीवन सजीव केले.प्रादेशिकतेच्या अस्सलपणाची व जिवंतपणाची उंची गाठली. अर्थात या सामर्थ्यास अस्सल मराठवाडी बोलीभाषेचा आधार व वापर महत्वाचा आहे.

भास्कर चंदनशिव यांच्या कथेतून अवतरणारा परिसर हा मराठवाडयातील कळंब व उस्मानाबाद या जिल्हयाच्या सीमारेषेवरचा आहे. स्वतः कथालेखकाचा जन्म, बालपण, शिक्षण कळंब–बीड परिसरात झाल्याने तेथील भाषेचा संस्कार त्यांच्यावर झाला. साहजिकच त्यांच्या कथालेखनातून येणारी भाषा ही मराठवाडी बोलीभाषा आली.या प्रदेशातील शब्दकळांचा, बोलीभाषेचा वापर करून मराठवाडयातील ग्रामीण जीवन अविष्कृत केले. यथार्थ जीवनदर्शन घडविणारे त्यांचे कथालेखन, बोलीचे रूपही समोर आणते. हे रूप दाखविण्याचा प्रयत्न या शोधनिबंधाचा आहे.

एकुणच मानवी व्यवहारात भाषेचे कार्य हे अतिशय महत्वपूर्ण आहे. किंबहुना भाषेशिवाय मानवी जीवन, सुसंवाद अशक्यच आहे. मानवी व्यवहारात भाषा ही संदेशवहनाचे महत्वपूर्ण काम करीत असल्याने मानवी ज़ीवन व्यवहारास पूर्णत्वच लाभत नाही. भाषा हे विचार प्रकटीकरणाचे,साहित्याचे देखील महत्वपूर्ण माध्यम आहे. जीवनातील वास्तवाचे प्रकटन साहित्यातून करावयाचे असेल तर त्या जीवनातील भाषेचा विचार व वापर हा साहित्यिकास करावा लागतो. म्हणूनच भाषा व शैली हे साहित्याचे परस्परपूरक व अविभाज्य असे घटक मानले जातात.



Scanned with OKEN Scanner

प्रत्येक प्रदेशाची काही वैशिष्टये असतात. ही वैशिष्टये त्या प्रदेशातील भौगोलिकता, निसर्ग, हवामान याचबरोबर तेथील समाजजीवन, लोकाचार, रूढी–परंपरा, लोकसमज, व्यवसाय तसेच भाषा यामधुन स्पष्ट होतात. अशा एखादया प्रदेशातील सर्जनशील, संवेदनशील लेखकाने निर्माण केलेल्या लेखनातून त्या प्रदेशाची वैशिष्टये प्रतिबिंबित झाली तर त्यात नवल वाटण्याचे कारण नाही. प्रदेशविशिष्ट बोलीभाषेच्या दृष्टीकोनातून लेखनाचा विचार केल्यास व्यंकटेश माडगुळकरमाणदेशी बोली, बहिणाबाई चौधरी अहिराणी बोली,उध्दव शेळके वऱ्हाडी बोली, मधु मंगेश कर्णिक कोकणी बोली, रा. रं. बोराडे मराठवाडी बोली याचप्रमाणे भास्कर चंदनशिव यांनी आपल्या कथालेखनात केलेल्या अस्सल मराठवाडी बोली भाषेच्या वापरामुळे वेगळेपण तसेच प्रदेशविशिष्टता असणारे भाषेचे रूप लक्षात येते.

मनोव्यापारास प्रकट करताना वळण व आकार देणारी शक्ती भाषेमुळे प्राप्त होते. म्हणुनच अनेक कथालेखक आपल्या परिसरात बोलल्या जाणाऱ्या बोलींचे, विविध व्यवसायानुरूप वापरल्या जाणाऱ्या शब्दांचे, लोकव्यवहारातील भाषेचा स्वीकार लेखनात करताना दिसतात.ज्यामध्ये भास्कर चंदनशिव यांचा समावेश होतो. अगदी मोकळया अशा भाषिक वातावरणात, ग्रामीण बोलीत कथानिर्मिती करणारे भास्कर चंदनशिव आपल्या कथेतील भाषा व शैलीबाबत म्हणतात, 'माझ्याही कथा संपुर्ण ग्रामीण बोलीभाषेच्या अर्थपूर्ण प्रतिमा–प्रतीकातुन आलेल्या आहेत.''यावरून बोलीभाषेच्या वापराचे महत्व लक्षात येते. विशिष्ट जीवनाच्या अभिव्यक्तीसाठी विशिष्ट भाषेची अपेक्षा केली जाते. त्या–त्या संस्कृतीला साकारताना अनुरूप भाषा ही कथेतून आली पाहिजे. स्थानिक भाषिक वैशिष्टये असलेली बोलीभाषा लेखकाला स्वीकारावी लागते. ज्यामुळे मुख्यतः कथेतील वातावरण निर्मिती तसेच कथेचा ओघ वाढून तिच्यात सजीवता येते.

भाषा म्हणजे कलाकृतीतील आशयाचा एक अपरिहार्य असा अविष्कार असतो.आशयाच्या अनुबंधाने भाषेची ठेवण, लय, मांडणी करावी लागते. तसेच समाजस्तर, व्यवसायानुरूप भाषेत फरक येतो यासंदर्भात र.बा. मंचरकर म्हणतात, "काळ, सामाजिक वर्ग, व्यवसाय, राजकीय विभाजन, भौगलिक अंतर यामुळे एक भाषिक समाज विभागला गेला की, भाषेत अनेकविधता येते." यानुसार ग्रामीण कथेच्या अविष्कारातही भाषेला मोठे महत्व दयावे लागते. महाराष्ट्रातील मराठी भाषेचे प्रदेश वैशिष्टयानुसार अहिराणी, कोकणी, वऱ्हाडी, पश्चिम महाराष्ट्री, मराठवाडी असे प्रमुख प्रकार दिसुन येतात. प्रादेशिक भाषेच्या या प्रवाहांनी मराठी साहित्यास समृध्द केले. त्यामध्ये ग्रामीण कथालेखक भास्कर चंदनशिव यांनी आपल्या लेखनातून अस्सल मराठवाडी बोलीभाषेचा वापर करून ग्रामीणकथा, साहित्य व भाषेस समृध्द केले.भास्कर चंदनशिव यांच्या कथेचा सर्वांगीण अभ्यास करणारे डॉ. अशोक देशमाने यांनी कथालेखकावर समोवतीच्या वातावरणाचा अर्थात प्रभाव नोंदवताना बोलीभाषेचा प्रत्यय येतो हे साधार सांगितले. सामान्य, शोषित, पीडीत, ग्रामीण माणूस कथेचा व आस्थेचा विषय झाले.

उदा 1)'बिरडं' मधील 'खरं मनलं तर भाऊचं घर ह्या बैलानीच मानसांत आनलं व्हतं. साताठ एकाराचं रान मऊसुद ताज्यागत करून, गणाभाऊ घरातल्या अंडयापिलानिशी राबत व्हता.'



Scanned with OKEN Scanner

2) 'भावजी, लेकरा–बाळानिशी ते तुमची सालं धरत्याल, रातंध्या तुमच्या शेतात पडून ऱ्हात्याल, पण ह्यवडी ह्या ऊसाची कशी तरी जाळभाज हुवू दया.''यासारख्या समर्पक शेतीसंबधीत बोलीभाषेचा वापर करून ग्रामीण जीवनाची स्पंदने, विविध समस्यांचा शोध घेतात.

दुष्काळ व भुकेच्या चित्रणातून बोलीभाषेची प्रचिती येते.

उदा –1)'अंगारमाती' मधील 'आतडी' कथेत लिहितात, "सारी भरवश्याची नकित्र कोरडीफट्ट गेली. माणसं हवालदिल झाली. कोरड्याठाक डोळयानं जळत्या आभाळकडं बघत–हायती तापल्या पत्र्यागत आभाळ निस्तंच ढणकत हायचं. आग वतायचं तर कवा, काळा करपाढग कुठे खोल आभाळबुडी झाकाळुन यायचा अन नळा फुटल्यागत पिसाट सुटणारं वारं, पुन्हा सारं सारं पुसून टाकायचं. माणसं टांगणी लागायची."

2)'नवी वारूळ' या कथासंग्रहातील 'आगटी' कथेतून भुकेसाठी चाललेला संघर्ष करणारा वर्ग प्रकट करताना प्रतिनिधीक स्वरूपात भुकेल्या पोटाच्या संतु नानांची अवस्था रेखाटताना बोलीभाषेचे दर्शन घडते ते म्हणतात, "सादळलेल्या कानाच्या पडदयावर घरातली हालचाल संतु नाना काळजीपूर्वक हेरीत व्हता. बदलत्या बदक–सदक आवाजाचं रुप मनातल्या धाग्या दोऱ्यात जोडुन उरासा टाकीत व्हता." माणसांच्या जीवन जगण्याच्या अशा विविध पध्दती त्यांनी रेखाटल्या. याशिवाय 'आगटी, बापलेक, पाणबळी, कळा, वासना, पोटांधळ' यासारख्या अनेक कथामधुन दुष्काळ व भुकेचे चित्रण करताना ग्रामीण बोलीभाषेचे दर्शन घडते.

कृषीजीवनाशी निगडीत असणाऱ्या बोलीतील संवादामुळे कथेतील व्यक्तिरेखा नव्हे तर संपूर्ण जीवनच जिवंतपणाचा अनुभव देते. म्हणुनच डॉ. अशोक देशमाने म्हणतात, "चंदनशिवांनी वापरलेल्या भाषेतुन मराठवाडयातील ग्रामीण भागातील शेतकरी माणूस सर्वांगाने साकार होतो. त्यांनी जर ही शेती निगडीत भाषा वापरली नसती तर कथागत पात्रांचे जीवनदर्शन सामग्रयानेत्यांना घडविता आले नसते. म्हणून कृषीजीवनाशी संबंधीत ही भाषा व त्या भाषेतून व्यक्त झालेले कृषीजीवनातील पसंग कथेला समृध्द करण्यास, बळ देण्यास अत्यंत प्रभावशाली ठरतात."देशमाने यांच्या या विधानावर खरे तर वेगळे भाष्य करण्याची गरजच वाटत नाही.

मानवी मनोवृत्तीचे नमुने साकारता बोलीभाषेचा प्रत्यय येतो.

उदा– 1) 'पाणी' कथेतील "छया, छया सदान्ना कवाबी फाटकयात पाय घालुनच बसतोय चलरं पोराव चला."

2) 'रंडकी आवस' मधील "कुठंतरी कुत्र्याचा रकुंदळ व्हतोय, मन डवचलं जातय, तपलेलं डोळं कान दावीत त्या बाजुला धावत्यात. आपुट कुत्रीला बडवून सुर्ती लावत्यात. मग ती घटकाभर वड घेत उभी ऱ्हातीय. जणू सर्गातून लाळ सोडतीय"याप्रमाणे विविध व्यक्तिरेखा आणि त्याचे भिन्न–भिन्न स्वभावधर्म संपूर्ण बोलीभाषेतुन त्यांच्या कथेत जिवंतपणे प्रकट होतात.

भास्कर चंदनिशव यांची भाषा विविध प्रतिमा व प्रतिकांनी युक्त आहे. ग्रमीण बोलीभाषेच्या अर्थपूर्ण प्रतिमा – प्रतिकातुन आल्या आहेत



Scanned with OKEN Scanner

उदा – 1)'आबामा' कथेतील आबामाच्या मनातील वासनांचे चिमण करताना "तंबोऱ्याने तार छेडली. चपुळया थयथयल्या. न्हालेल्या गवळणी तसल्या अंधारात डोळं घालु लागल्या, घुबडं खदखदली. मिशा पिंजारल्या. खाकरून मांडी सावरली. आंग चोरून बसलेली रात हळूच इरमून कोपटात शिरली" एक पूर्ण भावावस्था प्रतिमा व प्रतिकातून कशी व्यक्त होऊ शकते याचा एक उत्तम नमुना म्हणुन पुढे येतो. याशिवाय 'वाळवी' कथेतून नानाच्या थकलेपणाची मानसिकता, मनातील वेडी आशा सुचित करताना त्यांची निवेदनाची भाषा आशया संबंधी, अनुभव अभिव्यक्तीची अत्युच्य पातळी त्यांनी गाठलेली दिसते

विविध स्तरातील मानवी जीवनाचे चित्रण करणाऱ्या कथेत त्या जीवनाशी संबंधीत शब्द, उपमांची रेलचेल नजरेस पडते.

उदा – कस्याला, हेबक, थुका, पालता, न्हेमी, व्हट, साळंत, इचार, म्हागं, ढाळज, जाजाऊन, खिनभर, कसनुसं, टकुरं, उलसक, सबागती, मपलं, तुपलं, वायलं, रकुदंळ, चिरगुट, पुळका, काला, वळचनी, गरदाड, इंगा, हाऊत, करताव, टांगडं सारखी शब्दकळा तसेच शिष्टाचार न वाटावे असे काही अशिष्ट शब्दही येतात. ज्यामध्ये रांड, शिंदळ, हालकट, भवाने, सिरंदळबोडे, अवदसा, कैदासीन, केरसुणी, माडखाऊ, फोकलीचा, गधडीचा, मुडदा, आवा यासारख्या अशिष्ट शब्दाचा उल्लेख करता येईल.तसेच 'भडव्यानी दगा दिला, तुझ्या नरडीचा घोट घेतु, जगा मनावं फोद्रीच्या हो' यासारखी वाक्ये ग्रमीण जीवनसापेक्ष भाषाशैलीचा प्रत्यय देतात.

याशिवाय तुंबलेल्या बैलागत टवकारून बघणं, तेल आटल्या चिमणीच्या वातीगत यासारख्या उपमांनी आणि तुला न मला घाल कुत्र्याला, वाण गायीचा आन करणी कसाबाची, मरावं तर काशीत न्हायतर ईशीत, लाडानं येडं न पैशानं चढं यासारख्या म्हणींनीही कथेला आशय प्राप्त करून दिला

भास्कर चंदनशिव यांच्या कथेत आढळणारी तात्या, आबा, गया, धोंडीबा, बायजाक्का यासारखी येणारी नावेसुध्दा कथेचे वेगळेपण सांगतात. तसेच त्यांच्या बोलीचे वेगळेपण स्पष्ट करणाऱ्या बाबीत विशेषणे नामाला जोडुन येतात, कियापदाची रूपेही विचार करण्याजोगी, आवाजास शब्दरूप देण्याचा त्यांचा प्रयत्न यांचा समावेश होतो.

या वरील सर्व बाबींचा विचार केल्यास ज्या जीवनक्षेत्रातील अनुभवअसतो त्याच जीवनक्षेत्रातील भाषा वापरली तर तेलेखन प्रभावी ठरते. म्हणुनच प्रा. नरहर कुरूंदकर "ग्रमीण कथेचा सगळा जिवंतपणा तिच्या बोलीवर निगडीत असतो" असे म्हणताना दिसतात. ते अगदी समर्थकच होय. तसेच भास्कर चंदनशिवांच्या पिढीचे सिध्दलेखक व समीक्षक प्रा. डॉ. नागनाथ कोतापल्ले यांनी, सभोवतीच्या जनमाणसास समजेल अशा बोलीभाषेचा सातत्याने वापर करून संस्कतप्रचूर किंवा अलंकाराच्या आत्यंतिक वापरातुन आपली भाषा बोजड न होऊ देता ती अत्यंत प्रवाही, अर्थपूर्ण आणि काही ठिकाणी आवेशपूर्ण असल्याचे दिसते. अशा ग्रमीण लेखन शैलीच्या प्रभावातून लेखन करणाऱ्या प्रभावळीतील महत्वाचे मराठवाडयातील ग्रामीण कथाकार भास्कर चंदनशिव होत" असे जे मत नोंदवले ते खूपच अर्थपूर्ण वाटते



Scanned with OKEN Scanner

सारांश

काळाच्या ओघात जीवनातील परिवर्तनाच्या गरजेतून निर्माण झालेले वाङ्मयीनप्रवाह यांचे दर्शन घडते. त्यामध्ये ग्रामीण साहित्य हा प्रवाह तसेच भाषिकदृष्टया वेगळेपण असणारे साहित्य अवतरलेले दिसते ही बाब विलोभनीय वाटते 1970 च्या आसपास मराठवाडयात जी लेखकांची पिढी लिहिती झाली त्यात महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारघनाच्या प्रकाशात ग्रमीण जीवन, परंपरा, समाजरचनेचा नवा अन्वयार्थ शोधू पाहणाऱ्या पिढीत प्रत्यक्ष ग्रमजीवनातुन पुढे आलेल्या भास्कर चंदनशिव यांचा समावेश होतो. व्यक्त होण्याचे महत्वपूर्ण साधन असणारी भाषा कथानिर्मितीसाठी वापरली जी भाषा मराठवाडयाची प्रदेश विशिष्टता, संस्कृती, स्थानिक भाषिक वैशिष्टये घेऊन अवतरते. केवळ संवादच नाही तर वातावरण, निवेदनासाठी मायबोलीचा वापर केल्याने त्यांची कथा गुणवत्तापूर्ण, अर्थपूर्ण तसेच कथेस अस्सलपणा प्राप्त करून देते. कळंब–उस्मानाबाद परिसर कथेत असल्याने या परिसरातील स्थानिक बोलीभाषेचा वापर केलेला आढळतो. समोवतीच्या पर्यावरणाचा अस्सल मराठवाडी ग्रामीण बोलीभाषेद्वारे वेध घेतला. मुख्यतः मानवी जीवनातील सुक्ष्म हालचालीची नोंदी घेताना, कृषीजीवनाची संबंधीत विवेचन करताना या बोलीभाषेचे पदोपदी दर्शन घडते. जीवनानुभवाच्या प्रकटीकरणाचे माध्यम असणारी भाषा ग्रामीण जीवन व परिसराशी एकजीव बनते. जीवनानुभव प्रतिमा, प्रतिके, शब्द, वाक्य, म्हणी, उपमांनी बोचर होतो. यांना वगळून लेखन करायचे म्हटले तर त्यात कृत्रिमपणा जाणवला असता. त्यामुळे योग्य असाच अस्सल, कृषीकेंद्रित मराठवाडी ग्रामीण बोलीभाषेचा वापर करून कथेतील वास्तव तर अधिक प्रभावीपणे व्यक्त झाले. तसेच भाषा व बोलीच्या संदर्भात ग्रामीण कथेला एक विशिष्ट विकसित टप्प्यावर नेऊन ठेवले. कथाशयाची प्रखर जाणीव भास्कर चंदनशिव यांना असल्याने ग्रामीण आशयानुवर्ती अशी भाषा कथेतून आली. जी भाषा लेखकासह कथेलाही समर्थ बनवते.

संदर्भ ग्रंथ

1. डॉ. वासुदेव मुलाटे, 'ग्रामीण कथा : स्वरुप आणि विकास', साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती जानेवारी 1992.
2. डॉ. वासुदेव मुलाटे, 'ग्रामीण साहित्य : स्वरुप व दिशा', कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती जून 1994.
3. अशोक देशमाने, 'चंदनशिवांची कथा : स्वरुपमीमांसा', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती 24 एप्रिल 2008.
4. डॉ. वासुदेव मुलाटे, 'साहित्य : रुप आणि स्वरुप', कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, पहिली आवृत्ती जुलै 2009.
5. भास्कर चंदनशिव, 'बिरडं' साकेत प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती 2007.



Scanned with OKEN Scanner